महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotiskill@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/ ७२७ /२०२३-२४ दि.०७.०३.२०२४

**(UPSC, इंग्रजी माध्यम)**

## -:परिपत्रक:-

**विषय: संघ लोकसेवा आयोग (UPSC) इंग्रजी माध्यम २०२३-२४ परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता चौथ्या प्रतिक्षा यादीबाबत.**

महाज्योतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग (UPSC) इंग्रजी माध्यम २०२३-२४ परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांची प्रारूप निवड यादी तसेच पहिली, दुसरी व तिसरी प्रतिक्षा यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तथापि निवड यादी व प्रतिक्षा यादीतील काही विद्यार्थी रुजू न झाल्यामुळे अश्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करून विद्यार्थ्यांची चौथी प्रतिक्षा यादी यासह प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तिसऱ्या प्रतिक्षा यादीनुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी **श्रीराम आय.ए.एस. दिल्ली** येथील प्रशिक्षण केंद्रावर दि.०८.०३.२०२४ ते दि.१५.०३.२०२४ या कालावधीत रुजू व्हावे. चौथ्या प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण केंद्रावर हजर राहून दिलेल्या कालावधीत प्रवेश न घेतल्यास अश्या विद्यार्थ्यांची निवड रद्द करण्यात येईल याबाबत संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**(महत्वाचे:- ज्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी माध्यमाची निवड केलेली आहे अश्याच विद्यार्थ्यांची श्रीराम आय.ए.एस. दिल्ली येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांकानुसार निवड करण्यात आलेली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचे माध्यम बदलून मिळणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. ज्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून प्रशिक्षण हवे आहे अश्याच विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणकरिता रुजू व्हावे. )**

**टिप : दिव्यांग व अनाथ प्रवर्गातील तसेच विशेष मागास प्रवर्गातील महिला (SBC Female) उमेदवारांनी प्रशिक्षण माध्यमाची निवड केलेली नसल्यामुळे काही जागा रिक्त राहिल्या आहेत.**

(स्वा)
**(राजेश खवले)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर**